पुढारी शहर-जिल्हा कोल्हापूर, शुक्रवार, १२ एप्रिल २०२४

# 'पीएसआय' परीक्षेत नेर्लीची राखी कांबळे मागासवर्गीयांतून राज्यात पहिली

## परीक्षेचा निकाल जाहीर; ३७८ पदांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षकपदाच्या परीक्षेत नेर्ली (ता. करवीर) येथील राखी रमेश कांबळे हिने अनुसूचित जातीमधील महिला प्रवर्गामध्ये राज्यात पहिला क्रमांक पटकावला.

एमपीएससीच्या वतीने पोलिस उपनिरीक्षकपदासाठीच्या ३७८ जागांसाठी ऑक्टोबर २०२१ मध्ये जाहिरात निघाली. फेब्रुवारी २०२२ मध्ये पूर्व व ९ जुलै, २०२३ रोजी मुख्य परीक्षा झाली. त्यानंतर २ ते १० नोव्हेंबरदरम्यान शारीरिक चाचणी


राखी कांबळे


आरती कणिरे

झाली. त्यानंतर मुलाखती झाल्या. बुधवारी सायंकाळी राज्य लोकसेवा आयोगाने निकाल जाहीर केला. राखी कांबळे ही नेर्ली येथील आहे. तिने पहिल्याच प्रयत्नात कोणत्याही खासगी क्लासशिवाय यश संपादित केले आहे. राखीचे प्राथमिक शिक्षण विद्यामंदिर नेर्ली येथे, तर माध्यमिक शिक्षण नेर्ली विद्यालयातून झाले. महाविद्यालयीन शिक्षण शिवाजी विद्यापीठातून घेत अभियंता पदवी मिळवली. वडिलांनी प्रशासकीय सेवेचे ध्येय उराशी बांधून जो यशाचे शिखर गाठण्याचा मार्ग मुलीला दाखवला, त्या यशाच्या अटकेपार झेंडा फडकून वडिलांना तिने खरी श्रद्धांजली अर्पण केली आहे.

आरती जीवनधर कणिरे (मूळ रा. इंगळी, ता. हातकणंगले) हिने पोलिस उपनिरीक्षकपदाच्या परीक्षेत खुल्या प्रवर्गातून १२ वी रँक मिळवली. तिने कन्या मंदिर इंगळी येथे प्राथमिक, त्यानंतर न्यू इंग्लिश स्कूल, इंगळी येथे माध्यमिक, नंतर उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद महाविद्यालयात पूर्ण केले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्रातून एमबीए, एम.कॉम. पूर्ण केले. सध्या केएमसी महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. कुटुंब सांभाळून हे पद मिळवले. याशिवाय जिल्ह्यातील शिवानी पाटील (कोल्हापूर), विनया मराठे (वडणगे), शुभांगी चव्हाण (केर्ली), प्रियंका पाटील (चंदगड), स्नेहा शिर्के (कळंबा), प्रियंका घाटगे (राधानगरी) यांनी पोलिस उपनिरीक्षकपदासाठी यश मिळवले आहे.

12/04/24